CMYK

अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com ▪ शुक्रवार, दि.१६ फेब्रुवारी २०२४ ▪ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १३८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## पॅरोलवर आलेल्या आरोपीने केली मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

**मोहोळ** : पूर्वीच्या भांडणाच्या कारणावरून व जन्मठेपेची झालेल्या शिक्षेचा राग मनात धरून पॅरोल रजेवर घरी आलेल्या आरोपीने एकाला शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तर भांडण सोडविण्यासाठी गेलेल्यालाही काठीने मारहाण केल्याची घटना दि. १४ फेब्रुवारी रोजी रात्री ९:३० वाजण्याच्या दरम्यान मोहोळ तालुक्यातील नरखेड येथे घडली. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुभाष सुदाम उबाळे (रा. नरखेड, ता. मोहोळ) हे दि. १४ रोजी रात्री ९:३० वा. दरम्यान त्यांच्या बस स्टॅन्ड चौकातील हॉटेलजवळ बसले असता हणमंत भागवत गरड हा तिथे आला. त्याने पूर्वीच्या भांडणाच्या कारणावरून व त्यास जन्मठेपेची झालेल्या शिक्षेचा राग मनात धरून उबाळे यांच्या खुर्चीला जोराची लाथ मारून त्यांना खाली पाडून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

हनुमंत गरड हा पॅरोल रजेवर घरी आला आहे. तसेच हणमत गरड याचे वडील भागवत मुरलीधर गरड यांनी भांडण सोडविण्यास आलेल्या संतोष मोटे याला काठीने हातावर मारून जखमी केले असल्याची फिर्याद सुभाष उबाळे यांनी दिली असून त्यानुसार पोलिसांनी हनुमंत गरड व भगवान गरड यांच्यावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल आदलिंगे करीत आहेत.

# पुन्हा सारे आमदार पात्र मात्र राष्ट्रवादी दादांचाच

## अजित पवार पडले भारी; शरदरावांना एक चूक भोवली



सुराज्य/मुंबई

**राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष कोण असावा, हे मी ठरवू शकत नाही. मात्र, विधीमंडळ पक्षात बहुमत कुणाचे हा एकमेव निकष महत्त्वाचा आहे, असे स्पष्ट करत ५३ पैकी ४१ आमदार अजित पवार यांच्याकडे आहे. हे बहुमत शरद पवार गटाने नाकारले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार यांचाच आहे, असा निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रताप्रकरणात निकाल दिला.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कुठलीही फूट पडलेली नाही. मात्र तो गट तयार झालेले आहेत. प्राथमिक स्तरावर मी पक्षीय रचना, घटना व विधीमंडळ बळ या त्रिसूत्री वर मत नोंदवत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसची घटना सर्वात महत्त्वाची आहे. दोन्ही गट त्याला बांधिल आहेत. ३० जून २०२३ ला या पक्षात फूट पडली. अशावेळी नेतृत्त्वाबाबत पक्षाची घटना काय सांगते हे महत्त्वाचं आहे, असे निरीक्षणही नार्वेकर यांनी नोंदवले.

राष्ट्रवादी पक्षात अध्यक्ष पदावर दोघांकडून दावा केला जात आहे. दोन्ही गटांकडून पक्षाच्या घटनेप्रमाणे अध्यक्ष निवड झाली नसल्याचा दावा केला जात आहे. दोन समांतर नेतृत्व याठिकाणी उभे राहिले आहेत. तसेच दोन्ही गटांकडून अपात्रता याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा हे ठरवताना विधिमंडळ बहुमाताचा विचार करावा लागला. ५३ पैकी ४१ आमदार अजित पवार यांच्याकडे आहे. हे बहुमत शरद पवार गटाने नाकारले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार यांचीच आहे, असे ते म्हणाले. अध्यक्षपदाची निवड घटनेला धरुन नाही, असा दावा दोन्ही गटाकडून करण्यात आला.

२९ जून २०२३ पर्यंत शरद पवार यांच्या अध्यक्षपदाला आव्हान नव्हतं. पण ३० जून २०२३ रोजी दोन जणांकडून अध्यक्ष असल्याचा दावा केला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आपला अध्यक्ष कसा योग्य हे सिद्ध करण्यासाठी दोन्ही बाजूंनी पुरावे दिले. दोन्ही गटांकडून समांतर दावे करण्यात आले. प्रतिनिधिंच्या निवडणुकींचे पुरावे शरद पवार गटाकडून सादर करण्यात आले नाहीत. पक्षाचा अध्यक्ष कोण हे मी ठरवू शकत नाही.शिवसेना संदर्भात मी दिलेल्या निकालाचा दाखला याठिकाणी द्यावा लागेल. राष्ट्रवादी पक्षात अध्यक्ष पदावर दोघांकडून दावा केला जात आहे. दोन्ही गटांकडून पक्षाच्या घटनेप्रमाणे अध्यक्ष निवड झाली नसल्याचा दावा केला जात

### विधीमंडळ बहुमताच्या आधारे निर्णय

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणावर गेल्या तीन महिनाभरापासून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सुनावणी पार पडली. अजित पवार गटाकडे विधिमंडळात बहुमत असल्याने अजित पवार यांचा गट मुळ राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचे स्पष्ट होते.अजित पवार गटाकडे ५३ पैकी ४१ आमदार असल्याचे दिसते. शरद पवार गटाकडूनही ४१ आमदारांविरोधात याचिका दाखल केली आहे. यावरूनच कुणाकडे बहुमत आहे हे दिसते. त्यामुळे अजित पवार गटाकडे बहुमत असल्याचे स्पष्ट होते. घटनेनुसार पक्षांतर्गत झालेल्या प्रतिनिधी निवडणुकांचे पुरावे शरद पवार गटाकडून देण्यात आले नाहीत. २९ जून २०२३ पर्यंत शरद पवारांच्या अध्यक्षपदाला आव्हान देण्यात आले नाही. ३० जून रोजी दोन्ही गटाकडून दावा करण्यात आला. दोन्ही गटांकडून घटनेनुसार नेतृत्वाची निवड केल्याचा दावा करण्यात आला. दोन्ही गटाकडून याबाबत बाजू मांडण्यात आली.

आहे. दोन समांतर नेतृत्व याठिकाणी उभे राहिले आहेत. तसेच दोन्ही गटांकडून अपात्रता याचिका दाखल करण्यात आल्या आहेत, असे ते म्हणाले.

एनसीपी वर्किंग कमिटी ही पक्षाच्या घटनेप्रमाणे सर्वोच्च यंत्रणा आहे. त्यात १६ कायमस्वरूपी सदस्य आहेत. मात्र पक्षाची घटना कायमस्वरूपी सदस्यांना परवानगी देत नाही. नेतृत्व रचना, पक्षीय घटना आणि विधीमंडळ बळ पाहून पक्ष कुणाचा हे ठरवावे लागेल.यामध्यो पक्षीय घटना व नेतृत्व रचनेत सुस्पष्टता नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

विधीमंडळ सदस्यांची संख्या पाहता ४१ आमदारांचे पाठबळ अजित पवार गटाकडे दिसते. त्यामुळे अजित पवार यांना विधीमंडळ गटाचा पाठिंबा दिसून येतो.

अजित पवार गटाचे सर्व आमदार पात्र आहेत. सर्व याचिका रद्द करण्यात आल्या आहेत. नवनवीन पक्षांसोबत व विचारसरणी सोबत हल्ली युती व आघाडी होताना आपण पाहत आहोत. पण त्याचा अर्थ प्रत्येक घटनेवर दहाव्या सूचीनुसार कार्यवाही करता येत नाही, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

## वारकरी दिंडीला चारचाकी वाहनाची धडक एकाचा मृत्यू; पाचजण जखमी

सुराज्य/सांगोला

मिरज-पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरून माघीवारीसाठी निघालेल्या वारकरी दिंडीला पाठीमागून चार चाकी वाहनाने धडक दिल्याने एक वारकऱ्याचा मृत्यू झाला तर पाचजण जखमी झाले. ही घटना गुरुवारी सकाळी सहाच्या सुमारास काळू-बाळू वाडी येथे घडली.

वारकरी ज्ञानू बाळू पाटील (वय ५२) हे उपचार घेत असता मरण पावले. तर दोन पुरुष तीन महिला वारकरी गंभीर जखमी झाल्या. सर्व वारकरी कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यातील हुकेरी तालुक्यातील मसोबा हिरनी या गावातील आहेत

दिंडीतील वारकरी वसंत आप्पा पाटील (वय ७१) यांनी सांगोला पोलीस स्टेशनला फिर्याद दिली असून त्यामध्ये असे म्हटले आहे की कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यातील हुकेरी तालुक्यातील मसोबा हिरनी गावातील ३४ महिला पुरुष असे विठ्ठल भक्त वारकरी सालाबाद प्रमाणे माघी वारीसाठी पंढरपूरला विठ्ठल दर्शनासाठी पायी वारी करिता निघाले गुरुवारी १५ फेब्रुवारी रोजी मिरज -सांगोला पंढरपूर मार्गावरील विठ्ठलवाडी तालुका कवठेमंकाळ येथे मुक्काम करून पहाटे साडेचार वाजता पायी दिंडी निघाली व सकाळी सहा वाजता सांगोला तालुक्यातील जुनोनी जवळ काळू बाळू वाडी येथे दिंडी आली असता मिरज कडून सांगोला जाणाऱ्या अज्ञात चार चाकी वाहनाने भरधाव वेगाने दिंडीतील सहा वारकऱ्यांना जोरात धडक दिल्याने दिंडीतील वारकऱ्यात गोंधळ निर्माण झाला तोपर्यंत ते चार चाकी वाहन पसार झाले. दिंडीतील पाच वारकरी जमिनीवर कोसळलेले दिसले त्यामध्ये प्रतिभा वसंत पाटील वय ६०, ज्ञानू बाळू पाटील वय ५२, बाळू शंकर पुजारी वय ६२, महादेवी शिवपुत्र तेली वय ५०, सीमा विनायक सुतार वय ३८, अशोक गुराप्पा तांधले वय ५८, हे जखमी झालेले दिसून आले

ताबडतोब आजूबाजूला संपर्क करून रुग्णवाहिकेला बोलवण्यात आले सर्व जखमींना सांगोला येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारास दाखल केले जखमी मधील ज्ञानू बाळू पाटील यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यास पंढरपूर येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले तेथे उपचार चालू असताना सकाळी दहा वाजता ते मयत झाले तर इतर चौघांचा उपचार सांगोला येथील ग्रामीण रुग्णालयात चालू आहेत.

## जेल धडा पडणार महागात; चौकशीनंतर कारवाईचे पोलीस आयुक्तांचे आदेश

सुराज्य/सोलापूर


अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
गुरुवार, दि.१५ फेब्रुवारी २०२४ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १३७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८
www.surajyadigital.com
प्रवाशास मारहाण करून पैसे लुटले
मुस्ती येथे तरुणाची आत्महत्या
शाळकरी लहानग्यांना फीसाठी 'जेलचा धडा'
जन्मदाता कळवळून सांगता होता...
आमची लेकरे काय सराईत आहेत का? तरीपण..बालिकांना पोलिसांनी गाडीत बसविलंच !
फी न भरल्याने पाठविले पोलीस ठाण्यात; आरोपींप्रमाणे वागणूक
एचसीसी शाळा आणि पोलिसांनी तोडले अकलेचे कांदे
घाबरलेल्या मुलांचा हृदय पिळवटणारा आक्रोश
ऑन दी स्पॉट रिपोर्ट
स्थळ : सदर बझार पोलीस ठाणे
भेदरलेली अन् हताश झालेली 'ती' निष्पाप लेकरे...

सुराज्य Impact

शाळेची फी भरली नसल्याचे कारण सांगून विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर काढले व त्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना पोलीस गाडीत बसवून ठाण्यात नेले. हा प्रकार चुकीचा असून याचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार यांच्याकडे देण्यात आला आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर दोषींवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी दै. सुराज्यशी बोलताना दिली.

शहरातील रेल्वे लाईल परिसरातील हिंदुस्थानी काँन्व्हेंट इंग्लिश मिडीयम स्कूल म्हणजेच एचसीसी स्कूलमध्ये रमेश कोळी आणि त्यांचे बंधू यांची चार मुले ही इयत्ता ५ वी व ९ वी मध्ये शिक्षण घेत होती. त्या चार विद्यार्थ्यांची फी भरली नाही. या कारणावरून त्यांना परिक्षेस बसण्यास वंचित ठेवण्यात आले. शिवाय कोळी परिवाराच्या या मुलांना सातत्याने 'लक्ष्य' केले जात होते.

**विद्यार्थ्यांना पोलीस गाडीतून पोलीस ठाण्यात नेणे हा प्रकार चुकीचाच आहे. त्या ऐवजी विद्यार्थ्यांना घरी नेवून सोडले असते तर बरे झाले असते. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार यांच्याकडे चौकशीसाठी देण्यात आला आहे. त्यांचा चौकशी अहवाल आल्यानंतर दोषींवर कारवाई करण्यात येईल.**
**-एम. राजकुमार, पोलीस आयुक्त**

यात विशेष म्हणजे विद्यार्थी कोळी यांचे पालक जर शाळेच्या आवारात दिसले तर त्यांना पोलीस ठाण्याची हवा दाखवा. असा आदेश प्राचार्या इस्टर विनय यांनी दिला होता.

दि.१४ रोजी रमेश कोळी आणि त्यांचे पाल्य हे शाळेच्या मैदानात बसले होते. स्कुलच्या पदाधिकाऱ्यांनी सदर बझार पोलिस ठाण्यास फोन केला. यावेळी पोलिसांनी त्या विद्यार्थ्यांना व पालकांना पोलीस गाडीत बसविले आणि वरात थेट पोलीस ठाण्यात गेली. विद्यार्थी व पालकांना १ तास गुन्हेगाराप्रमाणे बसवून ठेवले.

पण स्कुलची एकतर्फी बाजू ऐकून पोलिसांनी कोळी यांचे ऐकले नाही. त्यांना आरोपीं प्रमाणे पोलीस ठाण्यात आणून बसविले. हे वृत्त दै. सुराज्यने प्रसिध्द करताच शाळेतील प्रशासनावर व पोलीस खात्याच्या कार्यपध्दतीवर संताप व्यक्त करण्यात येत होता.

## लाचखोर सरपंच पतींना अटक

सुराज्य/सांगोला

तालुक्यातील आलेगाव ग्रामपंचायत अधिपत्याखालील बाबरवाडी येथील हनुमान मंदिरासमोरील सभामंडपाचे काम पूर्ण केले त्याचे बिल मिळण्यासाठी तक्रारदार तथा ठेकेदार यांचे कडून लाचेची दहा हजार रुपये रक्कम स्वीकारताना सरपंच पती पांडुरंग रामचंद्र दिवसे वय ५१ यांना रंगेहात पकडण्यात आले आहे

याबाबत सांगोला पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. आलेगाव खालील बाबरवाडी येथे हनुमान मंदिरासमोरील सभामंडपाचे काम ठेकेदारास मिळाले होते सदरच्या कामाचे बिल ग्रामपंचायतीकडून मिळण्यासाठी ठेकेदार सतत पाठपुरावा करीत होता परंतु सरपंचाचे पती पांडुरंग दिवसे याने आठ हजार रुपये लाचेची मागणी केली.सरपंच नंदाबाई पांडुरंग दिवसे वय ४३ यांच्याकडे पडताळणी केली असता लाच पती पांडुरंग दिवसे यांच्याकडे देण्यास सांगितले. दहा हजार रुपये लाच घेताना निरीक्षक चंद्रकांत कोळी, पकाले गजानन किणगी, राहुल गायकवाड, श्याम सुरवसे यांनी सापळा रचून रंगेहात पकडले.

## इलेक्ट्रोरल बाँड योजना घटनाबाह्य

सुराज्य/नवी दिल्ली

निवडणुकीत पर्याय शोधताना राजकीय पक्षांना मिळणाऱ्या निधींची माहिती असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करत इलेक्ट्रोरल बाँड योजना घटनाबाह्य असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने व्यक्त केले. गुप्त इलेक्ट्रोल बाँडमुळे माहितीच्या अधिकाराचे आणि घटनेच्या कलम १९(१)(ए)चे उल्लंघन होत असल्याचेही स्पष्ट केले.

राजकीय पक्षांना आपले नाव गुप्त ठेवून आर्थिक मदत करण्यासाठी अरूण जेटली केंद्रीय अर्थमंत्री असताना २०१७च्या अंदाजपत्रकात या योजनेची घोषणा करण्यात आली होती. कोणती कंपनी, व्यक्ती अथवा संघटना कोणत्या पक्षाला किती मदत देते याची माहिती मिळू शकत नसल्याने त्यातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत होते. त्याआधी २० हजार रुपयांपेक्षा अधिक निधी देणाऱ्यांची नावे राजकिय पक्षांकडून जाहीर करण्यात येत होती.


**महत्वाचे मुद्दे**

**● या योजनेला विरोध करणाऱ्या याचिकेवर दोन स्वतंत्र पण एकमुखी नर्णिय देण्यात आला. या घटनापीठाचे नेतृत्व सरन्यायाधिश डी. वाय. चंद्रचुड यांनी केले. ● इलेक्ट्रोरल बाँड योजनेमुळे अभिव्यक्ती स्वतंत्र्याचे उल्लंघन होत असल्याचे सरन्यायाधिशांनी स्पष्ट केले. ● गोपनीयतेच्या मुलभूत हक्कात नागरिकांच्या राजकीय गोपनियतेच्या हक्काचा समावेश असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले. ● इलेक्ट्रोरल बाँडमुळे काळाया पैशाच्या समस्येशी सामना करता येतो, हा सरकारचा युक्तीवाद न्याय्य नाही. इलेक्ट्रोरल बाँड वितरीत करणे बँकांनी थांबवावे. ● स्टेट बँक ऑफ इंडियाने १२ एप्रिल २०१९ ला दिलेल्या अंतरीम आदेशानंतर वितरीत केलेल्या इलेक्ट्रोरल बाँडचा तपशील निवडणूक आयोगाकडे सहा मार्च २०२४ पुर्वी द्यावा. आयोगाने त्याची माहिती वेबसाईटवर जाहीर करावी.**



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




काय लिहिणार? आज ते परत नवीन चेहऱ्यासोबत दिसले!

कल्याण
226-07-278

मुंबई
456-52-336

# कुंडली बनवून गुन्हेगारी संपवणार : पोलीस आयुक्त

## गुंडालिस्ट तयार करण्याचे काम सुरू; झोपडपट्टी दादानुसार कारवाई करणार

सोलापूर/धनंजय मोरे

**शहरातील गुंडगिरी रोखण्यासाठी नूतन पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व येणाऱ्या उत्सवावर नियंत्रण ठेवण्यासाठी शहरातील गुंडांची गुंडालिस्ट तयार करण्याचे काम सुरु केले आहे, अशी माहिती राजकुमार यांनी दै. सुराज्यशी बोलताना दिली.**

शहरात सुरू असलेल्या चोऱ्या, घरफोड्या, मोटारसायकल चोरी, असे गुन्हे रोखण्यासाठी पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांना याबाबतच्या सूचना दिल्या आहेत तसेच येणारे उत्सव, महापुरूषांच्या जयंती अशा उत्सवामध्ये डीजे (डॉल्बी) मुक्त करण्यासाठी दोन दिवसापूर्वीच पोलीस आयुक्तालयात शिवजयंती निमित्त शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली. यावेळी पोलीस आयुक्तांनी उत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले व शहरात लावण्यात आलेल्या डिजीटल फलकावर छत्रपती शिवाजी



महाराजांचा फोटो लहान व शर्टाची वरची गुंडी उघडी ठेवलेल्या कार्यकर्त्यांचे फोटो मोठे असे दिसतात. त्यामुळे दस्तुरखुद्द पोलीस आयुक्तांनीच नाराजी व्यक्त केली.

डिजीटल लावावेत पण त्यावर महापुरूषांचे मोठे मोठे असावेत. डिजीटलमुळे शहर विद्रुप होवू लागले आहे. महापुरूषांच्या जयंती उत्सवात पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असावा. पण...अतिउत्साह असू नये. नाहीतर असे पदाधिकारी व कार्यकत्यांना पोलीस कारवाईस सामोरे जावेच लागेल,असे राजकुमार यांनी सांगितले.

नुकत्याच झालेल्या रमाई आंबेडकर जयंतीमध्ये डॉल्बी लावण्यावर पोलिसांनी कायद्याचा बडगा उगारून कायदेशीर कारवाई केली आहे. यामध्ये पोलिसांनी डॉल्बी चालक, मालक यांच्यावर संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत.

शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी, शहरात ज्यांच्यावर दोन पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत, अशा गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांच्या तडीपार व एमपीडीए अन्वये कारवाई करणार असल्याचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी सांगितले. आणि जर एखाद्या आरोपीस किंवा गुन्हेगारास तडीपार केले आणि जर तो आरोपी पुन्हा शहरात दिसला तर त्या आरोपीवर पुन्हा कारवाई करण्यात येईल.

एकंदर शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवायची असेल तर शहरातील दादा, आप्पा, आण्णा, डॉन, बॉस अशी बिरूदावली लावणाऱ्या गुन्हेगारांवर मग तो कोणत्याही गल्लीतील असो वा राजकीय वरदहस्त असलेला असो. याची कदर केली जाणार नाही. या आणि अशा लोकांपासून शहरवाशीयांना कोणतीही भिती वाटू नये. यासाठी शहरातील गुन्हेगारांची गुंडालिस्ट तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामुळे शहरातील मी-मी म्हणणाऱ्या गुंडांना धडकी भरली आहे. लवकरच अशा गुंडगिरी करणाऱ्या व स्वतःला दादा समजणाऱ्या स्वयंघोषीत दादांच्या व गुंडांच्या मुसक्या आवळण्यासाठी शहरातील गुंडांची गुंडालिस्ट तयार करणे हे गरजेचे आहे. याचे पडसाद उलकरच उमटता दिसतील. त्यामुळे आता शहरात गुंडांचा एम. राजकुमार आलेल्याचे शहरवासियांना लवकरच दिसेल.

CMYK